This Question paper shared by Khushbu Shinde from Dhule District. Thanks Khushbu.

इ. १२ वी | पूर्व परीक्षा २०२१-२२ | गुण - ८०
दि.१८/०१/२२ | विषय :- मराठी | वेळ - ३ तास

**विभाग - १ गदय - २० गुण**

**कृती १ अ) पुढील गदय उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.** ०८

१) (आकलन कृती)

आकृती पूर्ण करा. १

वाहनाच्या वेगामुळे हादरे बसून पुढील अवयव कमकुवत होतात. → [ ] → [ ]

२) एका वाक्यात लिहा. १

निसर्ग विरोधी धोरण → [ ]

वाहनाचा वेग अनिवार झाला. तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोळ्यांवर, मनावर,शरीरावर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. हादरे बसून मज्जातंतू आणि मणके कमकुवत होतात.कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहन धारकांची व्यथा असते. बसणे,उठणे,चढणे,उतरणे,चालणे,वळणे,वर खाली पाहणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरुन स्वत:ला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारुन आपल्या शरीर व्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्ग विरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहेत.वाढता वेग म्हणजे ताण. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे? आपले सत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे, हे आपले कर्तव्य आहे. उगाच भावविवश होऊन वेगवश होऊ नये.अनाठायी वेगामुळे पोचण्यापूर्वीच अंत होण्याची शक्यता वाढते.

**२) कृती करा.** १

१) वाहन धारकांची व्यथा → [ ]

२) वेगाबाबत आपले कर्तव्य → [ ] १

**३) स्वमत आणि अभिव्यक्ती कृती.** ४

* 'वाढता वेग म्हणजे ताण'याविषयी तुमचे मत सविस्तर लिहा.

**किंवा**

* वाहन चालवत असतांना कोणती काळजी घ्यावी. ते तुमच्या शब्दांत लिहा.



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

०८

कृती १ आ) पुढील गदय उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.

१) चौकटी पूर्ण करा. १

१) रक्तचंदनी फूल ⟶ [ ]

२) पहाटेच्या किरणांनी न्हाऊन निघालेले फूल ⟶ [ ]

२) वैशिष्ट्ये लिहा. १

१) सायली ⟶ [ ]

२) गुलमोहर ⟶ [ ]

दार उघडून मी हलकेच बागेत येतो पहाटेच्या किरणांनी मोगरा न्हाऊन निघालेला असतो. सायलीच्या इवल्या इवल्या पानांतून एक वेगळीच हिरवाई वाहू लागते. गुलमोहोराजवळ जावं तर त्यानं स्वागतासाठी केशरी सडाच शिंपून ठेवलेला असतो. जॅक्रांडाची निळी जांभळी फुल रक्तचंदनी चाफ्याशी बिलगून गप्पा गोष्टी करीत असतात.

चाफ्यांजवळ जाव तर त्यांच्या फुलांचा एक वेगळाच मंद मंद गंध येत असतो. पण तो निशिगंधासारखा मात्र नसतो. निशिगंध म्हणजे निशिगंधच ! त्याची सर इतर कुणाला येणार? पण निशिगंधाच्या पलीकडे मोगऱ्याची बहरलेली फुलं पाहिली की त्यांच्या सुगंधाचा मोह देखील आवरत नाही. या वेगवेगळ्या सुगंधाच नि माझं काही आदिम नातं तर नाही? त्यांची इतकी अनिवार ओढ माझ्या मनाला काबर लागून राहाते?

प्रकाश पसरु लागतो. तशी सकाळ होऊ लागते आणि मग दिसतं, की वाफे तर कोरडेच आहे. बागेतल्या नळाला रबरी पाईप लावून मी वाफ्यांमध्ये पाणी घालू लागतो. कुंडयांमध्ये पाईप लावू लागतो.

२) आकृती पूर्ण करा. २

लेखकाची सकाळची कामे ⟶ १) [ ] ⟶ २) [ ]

३) स्वमत किंवा अभिव्यक्ती कृती. ४

* 'रेशीमबंध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत लिहा.

किंवा

* निसर्ग व मानव यांच्यातील परस्पर संबंध तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

०४

कृती क्र.३ पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.

१) १) सुप्रसिध्द नर्तिका ⟶ १) [ ] १

२) रुग्णालयातील डॉक्टर ⟶ २) [ ]

२) * सुधा चंदन यांचे नृत्य कायमचे बंद पडण्याच्या मार्गावर होते. १

कारण :⟶ ---------------



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Khushbu Shinde from Dhule District. Thanks Khushbu.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

'नाचे मयूरी'हा चित्रपट अनेकांनी पाहिला असेल. सुप्रसिद्ध नर्तिका सुधा चंदन हिच्या आयुष्यावर तो आधारित होता. एका अपघातामध्ये सुधाला एक पाय गमवावा लागला होता. साहजिकच तिचं नृत्य कायमचंच बंद पडण्याच्या मार्गावर होत. पण सुधा जयपूरला गेली आणि तिथ तयार करण्यात आलेला कृत्रिम पाय आपल्या गमावलेल्या पायाच्या जागी बसवला. नृत्याची कारकीर्द तिन नव्यांन सुरु केली आणि त्या कृत्रिम पायाच्या आधारानं तिन भरघोस यश मिळवलं सुधा नं बसवून घेतलेल्या त्या कृत्रिम पायाचंच नाव आहे.'जयपूर फूट'जयपूर मधल्या एका रुग्णालयात तो प्रथम विकसीत केला गेला म्हणून त्याला ते नाव मिळाल.

जयपूरच्या रुग्णालयात डॉ.प्रमोद किरण सेठी अनेक विकलांगांवर उपचार करीत होते. पोलिओची बाधा झाल्यामुळे दिव्यांगतत्व आलेल्या मुलांना पाहून त्यांना एक कल्पना सुचली. पंडित राम चरण शर्मा या कलाकाराला विविध प्रकारची विलक्षण साधनं तयार करतांना त्यांनी पाहिलं होतं त्यांनी पंडितजीनी रुग्णालयात येण्याचं आमंत्रण दिलं.

पंडितजीनी रुग्णालयात,ज्यांचे पाय काही कारणांनी गमावले आहेत. अशांना परदेशातून आयात केलेले महागडे कृत्रिम पाय बसवतांना पाहिलेलं होत. ते परवडणारे नव्हते आणि ज्यांना ते परवडणारे होते त्याची ही चाल काही सुलभ होत असतांना त्यांनी दिसली नव्हती. ते पाहून त्यांच्या कल्पकतेला आव्हान मिळालं. त्यांनी व्हल्कनाईज्ड रबर आणि लाकूड या सहजगत्या उपलब्ध असलेल्या कच्च्या मालापासून हालचाल करण्यात सुलभ असा पाय तयार केला. डॉ.सेठी यांनी तो आपल्या एका रुग्णाला बसवून पहिला त्यासाठी शस्त्रक्रियेची नवी पद्धत विकसीत केली. त्या रुग्णाला त्याचा फायदा झाल्याचं पाहून त्यांनी पंडित जींना आणखी तसेच पाय तयार करायला सांगितल. आता परदेशातून कृत्रिम पाय आयात न करता हे लाकडी पाय बसवण्याचाच सिलसिला सुरु झाला. सुरुवातीला तर पंडितजींनी बांबूचाच वापर केला होता.पण हळूहळू इतर ही पदार्थाचा वापर करायला त्यांनी सुरुवात केली.

आता जगभर त्याचं रोपण केलं जातं.अदययावत प्लास्टिक व ॲल्युमिनियम यांचा वापर ही आता करण्यात येतो. पण मूळ कल्पना मात्र पंडितजीचीच राहिली आहे.

**१) चौकटी पूर्ण करा.** १

१) चित्रपटाचे नाव ⟶ [ ]

२) कृत्रिम पायाचे नाव ⟶ [ ]

**२) कृती करा.** १

सुलभ पाय तयार करण्याचा माल

↓ [ ] ↓ [ ]



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

## विभाग - २ पदय - १६ गुण

कृती २ अ) पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा. २
(आकलन कृती)

कृती करा

कवितेतील विरोधी भाव दर्शविणाऱ्या गोष्टी →
- [ ]
- [ ]
- [ ]
- [ ]

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा ।
कोण जाणे कोठुनी हया सावल्या आल्या पुढे
मी असा की लागती हया सावल्यांच्याही झळा
राहती माझ्यासवे ही आसवे गीतापरी;
हे कशाचे दु:ख ज्याला लागला माझा लळा ।
कोणत्या काळी कळेना मी जगाया लागतो (लागलो)
अन कुठे आयुष्य गेले कापुनी माझा गळा ।
सांगती 'तात्पर्य'माझे सारख्या खोटया दिशा
चालणारा पांगळा अन पाहणारा आंधळा ।
माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी;
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा ।

२) पुढील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.

१) हे कोणते अनामिक दु:ख आहे की ज्याला सदैव माझ्याविषयी प्रेम वाटावे ? १

→ [ ]

२) आयुष्याने माझीच का बरे फसगत केली ? १

→ [ ]

३) अभिव्यक्ती कृती. ४

* 'समाजात स्वत:चे वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न करावेच लागतात.' सोदाहरण स्पष्ट करा.



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Khushbu Shinde from Dhule District. Thanks Khushbu.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

**कृती २ पुढील ओळीचा अर्थ लिहा.** ४

आ) "माझेच रुप ल्यालेली,
तरी ही मी नसलेली,
किती बदललीस गं तू अंतर्बाह्य..."

**कृती २ काव्यसौंदर्य/रसग्रहण** ४

इ) अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला दार उघडून आत घेण्याचे ही भान नाही ग तुला बागेतील ती अल्लड जाई ही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून पण तू,तू,मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी.
या ओळीतून सूचित होणारा भावार्थ उलगडून दाखवा.

**किंवा**

**पुढील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.**

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतीच्या
गजाआड तो संत्रस्त वाटतो संध्याकाळी
पिंजारलेली दाढी,झिंज्या हताशपणे पाहत
असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील
मुलांकडे ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळयांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या
माणसांचे पाय, बसची चाके

**विभाग-३ साहित्यप्रकार(कथा) १० गुण**

**कृती क्र.३ अ) (कथा साहित्यप्रकार-परिचय-सैद्धांतिक पठित उतारा)** ४

**१) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.** १

**य) कृती करा**

कथेचा उद्देश → पूर्वी → [ ]
कथेचा उद्देश → नंतर → [ ]

प्रारंभी एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी कथालेखन केले गेले. नंतर नंतर मनोरंजन करण्यासाठी किंवा एखादा विचार,भावना,चित्ताकर्णक घटना वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथा लिहिल्या जाऊन लागल्या.

कथेत घटना असतात,कथानक असते, तिच्यात पात्रे असतात.स्थळ,काळ,वेळ यांचाही उल्लेख कथेत असतो. कथेच्या विषयानुसार तिच्यात विशिष्ट वातावरण ही असते. आणि समर्पक अशी निवदेन शैलीही असते.कथेतील पात्रांच्या परस्पर



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

संबंधातून निर्माण झालेले ताणतणाव,संघर्ष,गुंतागुंत ही कथेत असते आणि या सर्वाचा एक उत्कर्ष बिंदू ही (क्लायमॅक्स) असतो कथेत ! अर्थात यांसर्व घटकांनी युक्त अशा कथेला समर्पक शेवट ही असतो तसेच एक सुयोग्य आणि उत्तम शीर्षक ही असते.

थोडक्यात सांगायचे तर - कथा म्हणजे "एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्पर संबंधातून घडलेल्या घटनांचे एखादया विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा"

अर्थात प्रत्येक कथेत हे सर्वच घटक असतीलच आणि त्यांचे प्रमाणही सारखे असेल असे म्हणता येणार नाही.एखादया कथेत पात्रांना प्राधान्य असेल,तर एखादया कथेत प्रसंगांना कधी लेखकाचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा असू शकतो. तर एखादी कथा वातावरण निर्मितीचा हेतू लक्षात घेऊन लिहिली जाऊ शकते. तीच गोष्ट विचारांची आणि भावनांची ही असू शकते.थोडक्यात कथा म्हणजे केवळ प्रसंगाचे वर्णन नव्हे, केवळ व्यक्तीचे चित्रण नव्हे.निव्वळ दृष्टिकोन किंवा एकाच विचारांचा परिपोष नव्हे तर कथा म्हणजे पात्रे, प्रसंग, संघर्ष, गुंतागुंत,वातावरण विचार भावना,निवेदन शैली अशा सर्वाचे एक सुसंघटित प्रकटीकरण होय.

**१) एका वाक्यात लिहा.** १

कथा म्हणजे :- ------------------------------------------------

**२) आकलन कृती** २

* कथेत कोणकोणत्या बाबी असतात.त्या स्पष्ट करा.

**कृती क्र.३ आ) स्वमत आणि अभिव्यक्ती**

**पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) 'शोध'या कथेच्या नायिकेचे स्वभावचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

२) 'शोध'या कथेतील 'टॅक्सी ड्रॉयव्हर' हे पात्र तुम्हांला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण स्पष्ट करा.

३) 'गढी'या कथेतील गावातील उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

४) 'गढी'या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता पटवून दया.

## विभाग - ४ उपयोजित मराठी - १४ गुण

**कृती क्र.४ अ) (आकलन कृती)**

**पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ४

१) माहिती लिहा :- मुलाखतीची पूर्वतयारी

२) मुलाखतीचे प्रमुख हेतू तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

३) 'भाषाशैली'हे माहितीपत्रकाचे वैशिष्टये स्पष्ट करा.

४) 'निष्पक्ष-पातीपणा'हे अहवाल लेखनाचे वैशिष्टय तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.



Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Khushbu Shinde from Dhule District. Thanks Khushbu.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

**कृती क्र.४ आ) (कौशल्य कृती)**

**पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** १०

१) पुढील विषयावर अहवाल लेखन करा.
तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन.

२) एका वस्त्र दालनाचे आकर्षक माहितीपत्रक तयार करा.

३) पुढील व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.'परिचारिका (नर्स)'

४) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी स्पष्ट करा.

## विभाग - ५ व्याकरण व लेखन २० गुण

**कृती क्र.५ अ) व्याकरण** २

**१) वाक्यरुपांतर**

कंसातील सूचनांप्रमाणे वाक्यांचे रुपांतर करा.

१) आपल्याकडे कामाच्या ठिकाणाची अंतरे कमी आहेत. (नकारार्थी करा)

→ [ ]

२) आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. (उद्गारार्थी करा)

→ [ ]

**२) समास** २

**पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करा.**

| सामासिक शब्द | विग्रह |
| --- | --- |
| १) घरोघरी → | |
| २) अहोरात्र → | |
| ३) जीवनशैली → | |
| ४) ताणतणाव → | |

**३) प्रयोग** २

**पुढील वाक्यांचे प्रयोग ओळखा.**

१) माणसाने वेगाला आवरावे. → [ ]

२) माणसाने वाहन चालवले. → [ ]



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Contact us: @SahajAdhyayan
Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

**४) अलंकार** २

* **पुढील ओळीतील अलंकार ओळखा.**

१) आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी → ☐

२) न हे वदन,चंद्रमा शरदिचा हा केवळ → ☐

**५) वाक्यप्रचार**

* **पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** २

१) रंगून जाणे → ☐

२) आटापिटा करणे → ☐

३) आग ओकणे → ☐

४) अंगावर काटा येणे → ☐

**कृती क्र.५ आ) निबंधलेखन** १०

पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.

१) घरातील एक उपद्रवी
२) माझा वर्गमित्र
३) मी पाऊस बोलतोय !
४) माणूस बोलणे विसरला तर .....
५) समाज आणि आजचा युवक.

checked by
Patil
Smt- S.M-Patil
15/01/2022



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi